ग्रामसेवक या पदावर जिल्हा परिषद सेवेमध्ये पुनःस्थापित करणेबाबत.
(श्री. इम्रान निजामोद्दीन शेख, सेवा निलंबीत ग्रामसेवक, ग्रामपंचायत खुरदैठण ता.जामखेड)

जिल्हा परिषद अहमदनगर
सामान्य प्रशासन विभाग-२
जिल्हा परिषद आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ ४०३ /२०२३
अहमदनगर, दिनांक -२९/०३/२०२३

संदर्भ :- १. या कार्यालयाकडील सेवा निलंबन आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/५१७/२०२२, दिनांक- २९/६/२०२२
२. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र / ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/९९/२०२३, दिनांक- २७/१/२०२३
३. श्री. इम्रान निजामोद्दीन शेख,सेवा निलंबीत ग्रामसेवक, यांचे दि.८/३/२०२३ चे पत्र
४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३ (१)
५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३ (५)
६. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. निप्रआ-१११९/प्र.क्र.८६/११-अ, दिनांक- १४/१०/२०११
७. सामान्य प्रशासन विभागाकंडील शासन परिपत्रक क्र. विप्रआ-१११२/प्र.क्रं.८२/११-अ, दि.२० एप्रिल २०१३
८. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. निप्रआ-१११८/प्र.क्र.११/११अ, दिनांक- ०९/०७/२०१९

<u>आदेश</u>

ज्याआर्थी, श्री. इम्रान निजामोद्दीन शेख, सेवा निलंबीत ग्रामसेवक, ग्रामपंचायत खुरदैठण ता.जामखेड येथे कार्यरत असतांना ग्रामपंचायत कामकाजात गैरवर्तन केले असलेने संदर्भ क्रं.१ चे आदेशान्वये सेवा निलंबित करणे आले होते.

२/- ज्याआर्थी, संदर्भ क्र.२ अन्वये, श्री. इम्रान निजामोद्दीन शेख, सेवा निलंबीत ग्रामसेवक, यांचेविरुध्द दोषारोपाचे ज्ञापन बजावून शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित केलेनुसार व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. निप्रआ-१११९/प्र.क्र.८६/११-अ, दिनांक- १४/१०/२०११ मधील तरतुदींनुसार, खालील निम्न स्वाक्षरीत नियुक्ती अधिकारी यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे पोट नियम ३(५) नुसार, प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर याव्दारे, श्री. इम्रान निजामोद्दीन शेख, सेवा निलंबीत ग्रामसेवक, यांना ग्रामसेवक या पदावर पंचायत समिती पारनेर (कडा-आष्टी) येथे पुनःस्थापित करीत आहे. सदरची पुनःस्थापना ही विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस अधिन राहून करणेत येत आहे.

३/- आणखी असाही आदेश देत आहे की, श्री. इम्रान निजामोद्दीन शेख, सेवा निलंबीत ग्रामसेवक, यांचे निलंबन कालावधीचा निर्णय शिस्तभंग कार्यवाही पुर्ण झालेनंतर स्वतंत्ररित्या घेण्यात येईल.

४/- या आदेशाची नोंद श्री. इम्रान निजामोद्दीन शेख, ग्रामसेवक, यांचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 20230529060139 असा आहे.

(आशिष येरेकर, भाप्रसे.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

श्री. इम्रान निजामोद्दीन शेख, ग्रामसेवक,
व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर
प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर

२/-सोबतचा आदेश संबंधीतास बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास अहवाल सादर करावा.
प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती ---पारनेर---

२/- श्री. इम्रान निजामोद्दीन शेख, ग्रामसेवक, या पदावर सेवेत रुजू झालेनंतर रुजू अहवाल इकडेस सादर करावा.
प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.
प्रत :- सामान्य प्रशासन विभाग-२, ग्रामपंचायत आस्थापना-१, जि.प.अ.नगर

(आशिष येरेकर, भाप्रसे.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहमदनगर